I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 230-233
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article
Reg. No.: MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# भारतीय संविधान सामाजिक दास्य दूर करण्याचा दस्ताऐवज

रवींद्र मुरमाडे
मराठी विभाग डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
*Corresponding Author :- murmaderuo6 @gmail.com

Communicated : 20.12.2022 | Revision : 12.01.2023 Accepted : 20.01.2023 | Published: 30.01.2023

**सारांश :**
ब्रिटीशांच्या राजकीय गुलामीतून भारत देशाला स्वातंत्र मिळावे यासाठी असंख्य ज्ञात–अज्ञात हुतात्म्यांनी आपलं सर्वस्व वेचलं. शुरवीर हुतात्म्यांच्या बलिदानाच्या रक्तरंजित क्रांतीने भारत देशाला 'स्वतंत्र राष्ट्र' निर्मितीचे मधुर फळ प्राप्त झाले. भारत देश अनेक जाती, उपजाती, वर्ग आणि वर्ण, रूढी, परंपरा, उपासना, आराधना यासोबत घेऊन स्वतंत्र झाला. या स्वतंत्र देशाला निरपेक्ष; निधर्म आणि कोणत्याही माणसाला समान न्याय देणारी, एकसूत्रता साधणारी आदर्शवत घटनेची आवश्यकता होती. भारत देशाचा अनेक वर्षांचा इतिहास लक्षात घेता २९ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्याच्या केवळ चौदा दिवसातच भारतीय राज्य घटनेचा मसूदा बनविण्यासाठी समिती नेमल्या गेली. त्यात घटना मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होते. भारतीय राज्यघटने अंतर्गत सामाजिक न्याय, स्वातंत्र, समता व बंधुता प्रदान करून एक लोकशाही, धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक परिवर्तनशील राष्ट्राची निर्मिती करणे. हे घटनेचे मुळ उद्दीष्ट होते. आर्थिक आणि सामाजिक लोकशाही बरोबरच राजकीय लोकशाहीची आदर्श संकल्पना प्रत्यक्षात उतरविणे हे भारतीय संविधानाचे अंतिम लक्ष्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २६ नोव्हेंबर १९४९ ला स्वत: प्रत अर्पण केलेल्या भारतीय संविधान संस्कृती राष्ट्राचा सर्वांगीन विकासाबरोबरच सर्व नागरिकांस समान न्याय व समान संधी प्राप्त झाली. ज्यामुळे सर्वांचा कल्याण साधल्या गेला.
**मुख्यशब्द** : समता, न्याय, विश्वास, श्रध्दा, विचार स्वातंत्र, बंधुता, मुलभूत हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्य.

## प्रस्तावना :

भारत देशाच्या अनेक वर्षांच्या इतिहासाची जर आपण चाचपणी केली; तर एक गोष्ट मात्र आपणाला प्रत्यक्ष जाणवेल किंबहुना ते मान्य करावे लागेल की, 'भारत देशाचा अनेक वर्षांचा इतिहास हा पराभुतांचा इतिहास होता. अगदी साध्या–साध्या कारणांवरून या देशात महिनोंमहिने जातीय दंगली, दंगे–धोपे यांचे पेव फुटले होते. हे अनुभवलेले आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाले असले तरी ते इतक्या सहजासहजी मिळाले नाही. ह्यासाठी अनेकांना प्राण गमवावे लागले. रक्तरंजित क्रांती घडून आली. त्यानंतर तिरंगा ध्वज स्वातंत्र्याची यशोगाथा सांगत सन्मानाने जगाच्या इतिहासात स्वच्छंदपणे मानाने फडकू लागला. म्हणूनच २९ ऑगस्ट १९४७ रोजी म्हणजे स्वातंत्र्याच्या चौदा दिवसांतच भारतीय राज्यघटनेच्या मसुदा बनविण्याची समिती नेमल्या गेली. ज्यामध्ये भारतीय घटना समितीचे अध्यक्ष राष्ट्रपती हे होते. तर उर्वरित आठ पदाधिकारी. तर घटना मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होते व अन्य सात सभासद होते. भारतीय संविधान आणि मानवी जीवन यांचे सहोदर असलेल्या संविधानाने प्रत्येक भारतीय नागरिकाला प्रतिष्ठा मिळवून दिलेली आहे. ही उर्जा व ताकद प्रत्येकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपाने मिळाली हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे.

### लोकशाही धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताकची निमिर्ती:–

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाही पध्दती व त्यातील संविधानिक सूत्रे गौतम बुध्दांच्या काळापासून होती असे घटना समितीत स्पष्ट केले. बुध्द भिख्खु संघ ही संसदीय पध्दतीची संस्था होती. त्यामध्ये प्रस्ताव मांडणे, मतविभाजन, संघटनेचा आदेश ही आधुनिक संसदीय साधने त्याकाळी वापरण्यात येत होती. त्यामुळेच भारताला सांसदीय लोकशाहीचा स्वीकार सहजतेने करणे शक्य झाले. परंतु वर्तमानात भारतीय राजकारणात आणि समाजकारणात दिवसागणिक अनेक बदल संभवतांना दिसत आहेत. जे येणाऱ्या पिढ्यांसाठी अत्यंत मारक असणार आहे. राजकारणातील भक्तीमार्ग अलिकडे जोरात उफाळून येतांना दिसतो. लोकशाहीमध्ये निकोप समाजस्वाथ्यासाठी

स्वाभिमान व चारित्र्य याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महत्तम स्थान दिलेला आहे. लोकशाही धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक राष्ट्रात आजमितीला देशात धर्माच्या नावाखाली संविधानाकडे बघण्याची भूमिका बदलत चालली आहे. ही बाब लोकशाहीला मारक आहे.

भारतीय नागरिकाला संविधानाने प्रतिष्ठा मिळवून दिलेली आहे. सुप्रसिध्द राज्यशास्त्रज्ञ प्रा. ग्रॅनवील ऑस्टिन यांनी भारतीय संविधानाचे वर्णन हा सर्वप्रथम प्रामुख्याने 'एक सामाजिक दस्ताऐवज आहे' असे नमूद करतात. भारतीय संविधानाचे बहुतांश प्रावधान हे सामाजिक क्रांतीचे ध्येय साध्य करण्यासाठी तयार केले आहे किंवा ध्येयाच्या प्राप्तीसाठी आवश्यक आणि पूरक पार्श्वभूमी निर्माण करून या क्रांतीला प्रोत्साहन देण्यासाठी निर्माण केलेले आहे असे ते म्हणतात. परंतु लोकशाही धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक राष्ट्राची परिभाषा वर्तमानात बदलतानाचे चित्र दिसते आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेबांचे विधान अंत्यत मर्मग्राही आहे. ते म्हणतात,

"देशाचे भवितव्य विवेकवाद्यांच्या वर्गावर अवलंबून असते. हा वर्ग प्रामाणिक स्वतंत्र आणि नि:स्पृह असला तर संघर्ष काळात तो समाजाला योग्य मार्गदर्शन करू शकतो. "१यावरून त्यांच्यातील उत्तुंग विचार दृष्टीचा प्रत्यय येतो. विविधेतून एकतेची वाटचाल करू पाहणाऱ्या भारताचे प्रतिबिंब संविधानामध्ये अधिक प्रभावीपणे पडलेले आहे. भारतीय घटनेद्वारे स्वातंत्र्य, समता, बंधूता ही मूल्ये निर्माण करीत असलो तरी धर्मनिरपेक्ष देशात आजही सामाजिक व आर्थिक विषमता अस्तित्वात आहे. हा एक आंतरविरोध आहे. तो समूळ नष्ट करणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर भारताच्या सर्व नागरिकांना न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधूता प्रदान करून एकलोकशाही धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताकची निर्मिती करणे हे घटनेचे मूळ उदिदृष्टे आहे.

**सामाजिक व आर्थिक लोकशाही:–**

सामाजिक व आर्थिक लोकशाही शिवाय राजकीय लोकशाही म्हणजे राजकारणातील धोंडे व अडचणींना निमंत्रण होय. असमाधानकारक सामाजिक व आर्थिक परिस्थितीमुळे राजकीय अस्थिरता निर्माण होते. हे ही तितकेच सत्य आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात सामाजिक आणि आर्थिक हे विषय प्रकर्षाने मांडले. भारतीय राज्यघटनेचा बारकाईने अभ्यास केल्यास असे लक्षात येईल की, तिने सामाजिक समतेच्या तत्वाभोवती फेर धरलेला आहे. सामाजिक न्यायाचे तत्व हे भारतीय लोकशाहीच्या कार्यात्मकतेचे प्रमुख असे मार्गदर्शन तत्व आहे. या तत्वाच्या अंमलबजावणीवरच प्रामुख्याने भारतीय लोकशाहीचे भवितव्य अवलंबून आहे.

सामाजिक व आर्थिक लोकशाही संदर्भात भाष्य करताना डॉ. नरेंद्र जाधव म्हणतात की, "स्वतंत्र भारताची जडणघडण कोणत्या दिशेने व्हावी याचे स्पष्ट चित्र डॉ. आंबेडकरांसमोर होते. लोकशाहीचे ते कट्टर समर्थक होते. त्यांच्या डोळयासमोर एक भव्य कॅनव्हास होता. त्या कॅनव्हासवर माणसा माणसामधील राजकीय, सामाजिक व आर्थिक नात्यांचे मनोहर रंग एकमेकांत मिसळून त्यामधून ते सामाजिक आर्थिक लोकशाहीच स्वयंपूर्ण चित्र चितारू पहात होते."२हे वास्तव आहे. दु:ख आणि यातनांचा जन्म सामाजिक आणि आर्थिक कारणांमुळे होतो. म्हणून गरिबी हेच दु:खाचे कारण आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'बुध्द आणि त्यांचा धम्म' या ग्रंथात नमूद करतात. मार्क्सनेही आर्थिक विषमता आणि या अनुषंगाने होणारी पिळवणूक हे मानवी दु:खांचे मूळ सांगितले मार्क्सनेही वर्गविहीन, शोषण विहीन समाज हाच आदर्श मानवापूढे मांडून ठेवला आहे.

वर्तमान वास्तवाचा विचार करता भारतीय समाजव्यवस्थेमध्ये सामाजिक व आर्थिक विषमता पदोपदी

जाणवते. हयामुळे सर्वसामान्य माणसांचे जीवन कुठेतरी अस्थिर असतानाचे चित्र दिसते आहे. या देशात दिवसागणिक जीवनमूल्ये पायदळी तुडविली जात आहे. मानवी मूल्यांचे हनन होते आहे. संविधात माणसे जोडली जावी त्यांचे मूलभूत हक्क आणि अधिकार मिळावे यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपली सर्वंकष सम्यक शक्ती खर्ची घातली. त्यामागे राजकीय लोकशाही बरोबरच सामाजिक व आर्थिक लोकशाही या देशात प्रस्थापित करता येईल याचा सातत्याने विचार केला. संविधानाच्या ३८, ३९, ४६ या अनुच्छेदांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक न्यायाचा आदर्श मांडून ठेवलेला आहे. येथील पिचलेल्या, शोषित, वंचित घटकांच्या पदरात सामाजिक न्याय कसा टाकता येईल हा प्रश्न त्यांच्या मनात आयुष्यभर घोळत राहिला. सामाजिक न्यायाचा अभाव असेल तर लोकशाहीच्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक अंगामध्ये विसंगती व विरोधाभास निर्माण होतो, याची त्यांना पुरेपूर कल्पना होती. राजकीय जीवनात सामाजिक आणि आर्थिक विषमता असेल तर राजकीय लोकशाहीचा डोलारा कोसळेल; नव्हे शोषित लोकच तो उद्‌ध्वस्त करतील हे त्यांचे भाकित होते. ज्याप्रमाणे चीन देशाला माओच्या रूपाने शेतकऱ्यांच्या क्रांतीला नेतृत्व मिळाले. व्हियतनामला हो–चि–मिन्हच्या रूपाने देशाच्या क्रांतीला नेतृत्व मिळाले. रशियाला लेनिनच्या रूपाने कामगार क्रांतीला नेतृत्व दिले. तर सामाजिक दास्याची झळक असलेल्या भारतीय जातीव्यवस्थेला उद्ध्वस्त करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कुशल विधायक नेतृत्व मिळाले. ज्याची पाळेमुळे भारतीय संविधानामध्ये रूजलेली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या भारतीय घटनेतील मार्गदर्शक तत्वे ही सामाजिक व आर्थिक लोकशाहीच्या निर्मितीसाठी आहेत. जो समाज शतकानुशतके सामाजिक व आर्थिक न्यायाच्या प्रतिक्षेत होता. त्या शोषित, वंचित बहुजन समाजाला या प्रवाहात आणण्याचं महत्‌कार्य डॉ. बाबासाहेबांनी केलेले आहे.

भारतीय लोकशाहीच्या प्रवासाची नोंद घेतांना भारतीय जनमत सजग असल्याचा विचार मांडलेला असला तरी नव्यागत त्यातील अर्थ अन्वयार्थ लक्षात घेणे अत्यावश्यक आहे. जागतिकीरणाच्या प्रक्रियेने 'समुहवादा ऐवजी व्यक्तीवादाला'३ महत्व आलेले आहे.

व्यक्तीचे स्वातंत्र्य तिची समता, तिला अभिप्रेत न्याय अश्या रचनेतून जेव्हा आपण विचार करू लागतो. तेव्हा भारतासारख्या संविधानासमोरील प्रश्न उग्र बनतात. याचे मुख्यत्वे कारण म्हणजे भारतीय संविधान समुदवादी आहे ते व्यक्तीवादी नाही.

**जीवन मूल्यांचा प्रवासः—**

भारतीय संविधानाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेबांनी येथील तमाम लोकांचा जीवनमूल्यांचा प्रवास अधिक सुकर केला आहे. जात, धर्म, पंथ, लिंग, वर्ण यांना एकत्रित जोडण्याचं पवित्र कार्य केल आहे. माणसां माणसातील भेदभावाची दरी दूर सारून लोकांमध्ये समता व बंधूता प्रस्थापित केली आहे. श्रेष्ठ मानवीमूल्यांचा स्वीकार करून लोकांमध्ये जीवनमूल्ये रूजविले. भारतीय संविधान हे गणराज्यात्मक असल्यामुळे ब्बवनदजंइपसपजल वर विश्वास ठेवते. त्यामुळे येथील सत्ताधाऱ्यांनारोज उत्तरे द्यावी लागतात. हे विसरता कामा नये. परंतु भारतीय संविधानातील तरतुदींची पुरेशी अंमलबजावणी झाली नसल्याने समान सामाजिक न्यायाची स्थापना होऊ शकलेली नाही. म्हणून "या घटनेचे उगमस्थान भारतीय जनता असावी तसेच घटनेची शक्ती व सार्वभौम सत्ता ही सुध्दा भारतीय जनतेकडून प्राप्त झालेली असावी"४ हे विधान प्रत्येक भारतीय नागरीकास विचार करायला भाग पाडणारे आहे.

ज्या मुल्यांचा आधारावर, ज्या मुल्यांच्या प्रचारासाठी भारतीय संविधान निर्माण झालेले आहे. त्या समता,

स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा प्रवास मागील ७५ वर्षात कसा झाला हे अंतर्मुख होऊन कठोर आत्मपरिक्षण करण्याची वेळ आलेली आहे. कारण, या देशातील सामान्यातील सामान्य माणूस भारतीय संविधानाचा केंद्रबिंदू आहे सामान्य माणसाठी हे संविधान आहे. म्हणून येथील प्रत्येक सामान्य माणसाला भारतीय संविधान हे आपले वाटलं पाहिजे; जोपर्यंत सामान्य माणसाला भारतीय संविधान आपलं वाटत नाही, तो पर्यंत त्याला त्यांच्या हक्काविषयी कर्तव्याविषयी आणि जबाबदारीची जाणीव होणार नाही.

दिवसागणिक भारतीय राजकारणात अनेक उलथापालथ होतानाचे चित्र दिसते आहे. केंद्र सरकारमध्ये चढ–उतार आले. शासनकर्ते बदलले. पण लोकशाही टिकून आहे. कारण, भारतीय राज्यघटनेचा शासनकर्त्यांवर एकप्रकारचा अंकूश आहे. आपल्या सत्तेचा जर कोणी अतिरेक केला, तर त्याला सत्तेवरून खाली उतरविण्याची क्षमता घटनेत आहे. कोणी पदाचा गैरवापर केला तर योग्य शिक्षेसाठी न्यायालयीन व्यवस्था आहे. अन्यायाविरूध्द लढण्यास वेगवेगळया तरतूदी घटनेत आहेत. ही किमया डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधान लिहून साधली. सर्वांचे हित आणि कल्याण ज्यामध्ये समाविष्ठ आहे. त्या भारतीय संविधानाची अंमलबजावणी व पालन नि:स्वार्थ करणे गरजेचे आहे.

२६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्वत: प्रत अर्पित केलेल्या भारतीय संविधान संस्कृतीमुळे हिंदुस्थानचा प्रवाह हा प्रशस्त खुल्या व समृध्द भारत राष्ट्राकडे जाणारा सर्वांगीण कल्याणाचा राजमार्ग आहे हे विसरता कामा नये. या राजमार्गाची प्रगल्भता, सौष्ठवता त्यांच्या मूल्यांमुळे अधिक दमदार आणि माणूस कल्याणाचा उद्घोष करणारी ठरली आहे. भारतीय संविधान समता, न्याय, विश्वास, श्रध्दा, विचार स्वातंत्र्य, बंधुता, मुलभूत हक्कांचे संरक्षण करून इतरांचा स्वातंत्र्यांचेही जतन करण्यासाठी बांधील असल्याची ग्वाही देते. यातून नैतिक मूल्ये व कर्तव्याची जाण बाळगली जाते. तथागत गौतम बुध्दांच्या विचारांचा स्पर्श या संविधानाला लागला असल्यामुळे निश्‍चितच बुध्द परंपरेतील संवैधानिक संस्कृतीची पुनर्पेरणी करण्याचे राष्ट्रीय कामगीरी डॉ. बाबासाहेब आंबेकरांनी भारतीय राज्यघटनेद्वारा केलेली आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सामाजिक दास्यत्व दूर करणारा 'संविधान संस्कृती पुरूष' म्हणून ओळखले जातात.

**समारोप:–**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल भारतीय संविधान म्हणजे धर्मप्रवण राष्ट्राकडून मानसिक बदल स्वीकारून प्रगल्भव प्रशस्त भारतीयत्वाकडे जाणारा परिवर्तनशील राजमार्ग ज्यातून संविधानिक मूल्ये जोपासली जातात.

**निष्कर्ष:–**

१. सामाजिक व आर्थिक मूल्यांची जोपासना करणे.
२. हक्क व मुलभूत कर्तव्याची जाणीव निर्माण होणे.
३. व्यक्तिची महत्व सिध्द करणे.
४. माणसाची प्रतिष्ठा राखणे.
५. जीवनमूल्ये समता, स्वातंत्र्य, बंधुता व सामाजिक न्याय यांची जोपासना करणे.
६. राष्ट्राची अखंडता व एकात्मता राखणे.

**संदर्भ :**

भी.रा. आंबेडकर – रायटिंग अँड स्पीचेस, खंड १, मुंबई,१९७९ पृ.६२
तेलतुंबळे आनंद – सामाजिक न्याय आणि जागतिकीकरण –लोकवाड्मय गृह, मुंबई, आ, २०१०, पृ.१३
नरेंद्र जाधव –डॉ. आंबेडकर आर्थिक विचार आणि तत्वज्ञान, सुगावा प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती १९९२ पृ. ८३
बी.टी. देशमुख –भारतीय संविधान, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर चवथी आवृत्ती १९९८ पृ.१२